महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
४०० केव्ही ग्रहनकेंद्र विभाग वाळूज
प्लॉट क्रमांक एल-२ ,एल-३,एम.आय.डी.सी.वाळूज,छत्रपती संभाजीनगर ४३११३६
फोन नंबर (का) ८०५५००२०३३ .ई मेल आय डी- ee2130@mahatransco.in

जा.क्र. अअ / ४००केव्ही / ग्र.के./ वाळूज / मासं / No - 0384 दिनांक 30 JUL 2024

## शिकाऊ उमेदवार कायदा,१९६१ अंतर्गत वर्ष २०२३-२०२४ करीता ४०० केव्ही ग्रहनकेंद्र विभाग वाळूज येथे निवड झालेल्या उमेदवारांची तात्पुरती निवड यादी.

### निवड यादी-३

१. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतुन विजतंत्री ( **Electrician)** या व्यवसायातुन राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद ( **NCVT)** उत्तीर्ण उमेदवारांकडुन ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याकरिता शेवटची तारीख १९.१०.२०२३ अशी होती तसेच ऑनलाईन पद्धतीने सादर केलेल्या अर्जाचा **Screen Shot** घेऊन ( पोस्टाने / कुरिअरने / हातोहात ) अर्ज मागविण्यात आले होते. सदरील अर्ज सादर करण्याची अंतिम दिनांक २६.१०.२०२३ होती.

२. उमेदवारांची तात्पुरती निवड यादी तयार करण्यात आली असुन उमेदवारांची निवड यादी त्यांना एस.एस.सी व आ.टी.आय विजतंत्री ( **Electrician)** मध्ये प्राप्त झालेल्या एकत्रित गुणांच्या सरासरीच्या आधारावर तसेच त्यांनी त्यांच्या अर्ज मध्ये दर्शविलेल्या जात व इतर माहितीच्या आधारे तयार करण्यात आलेली आहे.

३. तात्पुरती निवड झालेल्या सर्व उमेदवारांना त्यांची शैक्षणिक अर्हता, जात, वय, उन्नत गटात मोडत नसणे इत्यादी बाबतचे सर्व मुळ प्रमाणपत्र/कागदपत्रे हि पडताळणीच्या वेळी सादर करणे बंधनकारक राहील व सादर न करु शकलेल्या उमेदवारांची निवड रद्द करण्यात येईल.

४. तात्पुरत्या निवड यादीत नावेचा समावेश आहे म्हणुन शिकाऊ उमेदवारीसाठी उमेदवाराचा कोणताही हक्क राहणार नाही हि निवड यादी तात्पुरती असुन पूर्णत: उमेदवारांची शैक्षणिक अर्हता जात प्रवर्ग व इतर अटी व शर्ती पुर्ण करण्याच्या अधीन राहुन आहे. त्यामुळे शिकाऊ उमेदवार म्हणुन निवड होण्यासाठी आवश्यक असलेली पूर्वावश्यकता धारण करीत नसल्यास किंवा आवश्यक अटी व शर्तींचा भंग होत असेल तर संबंधित उमेदवारांची उमेदवारी/निवड कोणत्याही टप्प्यावर रदद करण्यात येईल.

५. तात्पुरत्या निवड यादीत नावाचा समावेश आहे म्हणुन शिकाऊ उमेदवार कागदपत्र पडताळणीत अपात्र आढळुन आल्यास अथवा कागदपत्र पडताळणी करीता गैरहजर राहील्यास अथवा कागदपत्र पडताळणी मध्ये पात्र असुन देखील व्यवसाय प्रशिक्षणासाठी हजर न झाल्यास उमेदवारास पुनश्च संधी दिली जाणार नाही तसेच त्यांची उमेदवारी रद्द समजण्यात येईल याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

६. खालील गुणवत्ता धारक उमेदवारांची निवड , सक्षम निवड समिती व कार्यकारी अभियंता, ४०० केव्ही ग्रहनकेंद्र विभाग वाळूज हे राखुन ठेवत आहेत.

७. कार्यकारी अभियंता, ४०० केव्ही ग्रहनकेंद्र विभाग वाळूज या विभागात **तृतीय** यादीत निवड झालेल्या उमेदवाराची तात्पुरती निवड यादी खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | विभाग कार्यालयाचा अ.क्र. | उमेदवाराचे नाव | जात | गुणाची टक्केवारी | निवडीचा प्रवर्ग | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | **Open Category** | | | | |
| 1 | 141 | Ganesh Dnyaneshwar Barbade | EWS | 89.19 | Selected Against Open | |
| | | **SC Category** | | | | |
| 1 | 48 | Vaibhav Vijay Khilarkar | SC | 86.78 | Selected Against SC | |
| | | **ST Category** | | | | |
| 1 | 176 | Rubeena Salim Tadvi | ST | 79.18 | Selected Against ST | |
| | | **EWS Category** | | | | |
| 1 | 174 | DEEPAK Dnyaneshwar Barbade | EWS | 88.38 | Selected Against EWS | |

९. तात्पुरत्या निवड यादी तयार करताना सर्व प्रकारची काळजी घेण्यात आली आहे. तथापि, अनावधानाने किंवा मुद्रण दोषामुळे झालेल्या चुका सुधारीत करुन योग्य ती कार्यवाही करण्याचे अधिकार सक्षम निवड समिती व कार्यकारी अभियंता, अउदा कार्यकारी अभियंता, ४०० केव्ही ग्रहनकेंद्र विभाग वाळूज हे राखुन ठेवत आहेत.

१० निवड न झालेल्या उमेदवारांनी कोणत्याही प्रकारे पत्र व्यवहार किंवा ई-मेलव्दारे कार्यकारी अभियंता, ४०० केव्ही ग्रहनकेंद्र विभाग वाळूज या कार्यालयाकडे करु नये. उमेदवाराच्या कोणत्याही पत्र व्यवहाराची किंवा ई-मेलची दखल या कार्यालयाकडून घेतली जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

११. तात्पुरती निवड यादी मधील उमेदवारांनी दिनांक ३१.०७.२०२४ पर्यंत कार्यकारी अभियंता, ४०० केव्ही ग्रहनकेंद्र विभाग, प्लॉट क्रमांक एल-२ ,एल -३ ,एम.आय.डी.सी. वाळूज ४३११३६ या पत्त्यावर कार्यालयीन दिवशी (शनिवार,रविवार व सार्वजनिक सुट्टी वगळून) सकाळी १०:०० ते सायंकाळी ०६.१५ या कार्यालयीन वेळेत खालील मूळ प्रमाणपत्रासह हजर रहावे. दिनांक ३१.०७.२०२४ नंतर कागदपत्र पडताळणीसाठी येणा-या उमेदवारांची निवड रद्द करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

<u>प्रमाणपत्रांची यादी खालीलप्रमाणे</u>

१ १०वी गुणपत्रक
२ १०वी सनद
३ आयटीआय गुणपत्रक (चार सेमीस्टर)
४ जात प्रमाणपत्र / आर्थिक दुर्बल घटक असल्यास (EWS) प्रमाणपत्र
५ आधार कार्ड
६ ऑन लाईन (पोर्टलव्दारे) केलेल्या अर्जाची स्क्रीन शॉट
७ उन्नत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र (नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र) (लागू असल्यास)
८ बँक पासबुक
९ वरील सर्व मूळ कागदपत्र तसेच सर्व कागदपत्रांचा वरील प्रमाणे साक्षांकित प्रतींचा १ संच

१२. कागदपत्रे पडताळणी करीता येणा-या उमेदवाराना कुठल्याही प्रकारचा प्रवास खर्च किंवा इतर खर्च दिला जाणार नाही. उमेदवारांना स्वखर्चाने कागदपत्र पडताळणी करता उपस्थित राहावे लागेल.

( काकासाहेब पोटे )
कार्यकारी अभियंता
४०० केव्ही ग्रहनकेंद्र विभाग वाळूज

प्रत सविनय सादर-

अधिक्षक अभियंता, अउदा संवसु मंडळ, महापारेषण, छत्रपती संभाजीनगर

.......निवड समितीने निवड करुन दिलेल्या उमेदवारांची निवड यादी प्रमाणे तात्पुरती निवड यादी प्रसारीत करण्यात आली आहे.